महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/स्थापत्य क्षेत्र भेट/२०२३/ 1673 दिनांक : १८.०४.२०२३

20 APR 2023

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व पदवी/पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : स्थापत्य अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करणेबाबत..**

संदर्भ : १) प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांचे पत्र जा.क्र. मअसंसं/आस्था-३/३८१/२०२३ दिनांक २८.०२.२०२३
२) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/२०२३/२९९ दिनांक १३.०४.२०२३.

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च दर्जाची अशी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक येथे कार्यरत आहे. या संस्थेंतर्गत मुख्यतः जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांच्या क्षेत्रीय समस्यांशी संबंधित उपयोजीत संशोधनाची (Applied Research) कामे केली जातात. राज्य स्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागातील तसेच राज्याबाहेरील संशोधन विषयक कामे हाताळली जातात.

या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व पदवी व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविण्या-या संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमधील स्थापत्य अभ्यासक्रमास शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक येथे क्षेत्रिय भेट आयोजित केल्यास सदर विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल व अभियांत्रिकी कौशल्य वाढण्यास वाव मिळेल. तरी आपण उपरोक्त संस्थेमध्ये स्थापत्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रिय भेट आयोजित करावी.

सोबत : संदर्भ क्रमांक १ मधील पत्र.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्रमांक १०)
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

प्रशासन अधिकारी
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक ४२२ ००४.
दुरध्वनी क्र. ०२५३-२५३११५३
ई-मेल : adm.meri@gmail.com
संकेतस्थळ : www.merinashik.org

सत्यमेव जयते
जलसंपदा विभाग

Administrative Officer
Maharashtra Engineering Research Institute,
Nashik 422 004
Phone No. : 0253-2531153
Email:adm.meri@gmail.com
Web : www.merinashik.org

जा.क्र.मअसंसं/आस्था-३ /३८१ /२०२३ दि. २८/०२/२०२३

प्रति,

मा.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग,
पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१

**विषय** :- स्थापत्य अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेट आयोजित करणेबाबत.

महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च दर्जाची अशी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था ( मेरी)) ,नाशिक येथे कार्यरत आहे.या संस्थेंतर्गत मुख्यतः जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांच्या क्षेत्रीय समस्यांशी संबंधित उपयोजीत संशोधनाची (Applied Research) कामे केली जातात. राज्य स्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागातील तसेच राज्याबाहेरील संशोधन विषयक कामे हाताळली जातात.

या संस्थेमध्ये संधोधन कामांव्यतिरिक्त बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या, मृद चाचण्या, रस्त्यांच्या चाचण्या, मिश्र संधानक संकल्पन ही कामे केली जातात. तसेच सुदुर संवेदन तंत्राने जलाशयातील गाळ सर्वेक्षणाचे कामे, पीक मोजणीची कामे इ. कामे केली जातात. निमशासकीय आणि खाजगी संस्थाकडून येणा-या कामासंबधीचे उपायोजित संशोधन व चाचणी कामेही केली जातात.

आपले अखत्यारीतील मान्यताप्राप्त नाशिक जिल्हयातील व इतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य पदवी तसेच पदविका मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी)) ,नाशिक येथे क्षेत्रिय भेट आयोजित केल्यास त्यांच्या ज्ञानात भर पडेल व अभियांत्रिकी कौशल्य वाढण्यास वाव मिळेल.

सदर विषयी आपण आपले स्तरावरुन नाशिक जिल्हयातील आपले अखत्यारीतील अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतन विद्यालये यांना अवगत करावे व त्यांच्या क्षेत्रिय भेटी या संस्थेत आयोजित करण्याविषयी निर्देश देण्यात यावेत ही विनंती. तसेच या सर्व महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांची अद्यावत पत्ते, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल या संस्थेस उपलब्ध करुन देण्यात यावेत ही विनंती

( कि. ज. देशमुख )
प्रशासन अधिकारी,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक ४२२ ००४

**प्रत** :- मा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.